**MHST0500 0445 2008**

**नियमित दि.मु.क्र.३१०/२००८ मधील निशाणी क्र.१७३ वरील आदेश**

**१. श्रीरंग बाजी माळी मयत वारस**

**१अ. सुभद्रा श्रीरंग माळी व इतर**

**वि.**

**१. विलास सखाराम जाधव व इतर**

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. ए. आर. निकम.**

**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. आर. सी. शहा.**

**निशाणी १७३ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.३ याने वादी क्र.१ब हे मयत झाल्याने त्याचे कायदेशीर वारस यांना अभिलेखावर घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व त्याच अर्जावर प्रतिवादी यांचे विधीज्ञ यांनी स्वहस्ताक्षरात दिलेले सविस्तर लेखी म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेतला.

०३. प्रस्तुत अर्जातील कथनावरून असे दिसून येते की, वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादी क्र.१ब यांना शोभा रामचंद्र माळी या एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी शोभा रामचंद्र माळी या अभिलेखावर येणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास हरकती नोंदविलेल्या आहेत.

४. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरूध्द निरंतर ताकीद मनाई आदेश मिळावा या व इतर मागण्यांकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना लागल्यानंतर त्यांनी न्यायालयात हजर होवून म्हणणे दाखल केलेले आहे. या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी वादमुद्यांची निश्चिती केलेली आहे. वादीतर्फे पुरावा बंद झाल्यानंतर प्रतिवादी यांच्यातर्फे देखील पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. प्रकरणाची कार्यवाही

चौकशीकामी प्रलंबित असताना वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. त्याबाबतचा मृत्यूचा दाखला नि.क्र.१७६ च्या यादीसमवेत अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा दाखला वादी क्र.३ श्री. युवराज बाजी माळी याने नि.क्र.१७० वर जे प्रतिज्ञापत्र केले आहे त्या प्रतिज्ञापत्रातील कथन की, वादी क्र.१ब हे दि.२१/०१/२०२४ रोजी मयत झाले या कथनास पुष्टी व दुजोरा देतो. तसेच, वादी क्र.३ याने शपथेवर वादी क्र.१ब यांना शोभा रामचंद्र माळी या त्यांच्या पत्नी एकमेव कायदेशीर वारस असल्याचे सांगितलेले आहे. मयत वादी क्र.१ब नंतर उर्वरीत वादी व मयताचे वारस यांच्या बाजूने दावा टिकून राहतो. मयताचे वारस हे आवश्यक व योग्य ते पक्षकार आहेत. दावा हा अचल मिळकतीचे अनुषंगाने दाखल झालेला आहे. मयताचे कायदेशीर वारस यांचा दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास व त्यांना दाव्यात पक्षकारपणात सामील करून न घेतल्यास कायदेशीर वारसांचे नुकसान होवून पुन्हा दावे करावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व कारणांचा विचार करता अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी १७३) चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत वादी क्र.१ब यांच्या नावासमोर सरनाम्यात 'मयत' असा उल्लेख करण्यात यावा.

३. वादी याना शोभा रामचंद्र माळी यांना वादी क्र.१ब१ असे पक्षकारपणात सामील करण्याकरीता परवानगी देण्यात येत आहे.

४. वादी यांनी सदरची दुरूस्ती या आदेशापासून १४ दिवसांच्या आत करून दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी असा आदेश देण्यात येत आहे.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2025.03.05 11:04:11 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः ०३/०३/२०२५ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.